**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२२/२०२३</u>**

(धोंडीराम वि. सर्जेराव)

(CNR : MHSN050001262023)

## नि.क्र.१ वरील आदेश

प्रस्तूत प्रकरणात वादी व प्रतिवादी हे त्यांच्या वकीलांसह हजर झाले व सदरचे प्रकरणे हे तडजोडीसाठी मध्यस्थीकडे पाठविण्याची विनंती केली. त्याअनुषंगाने सदरचे प्रकरण मध्यस्तीकडे पाठविण्यात आले. मध्यस्थी यांनी नि.क्र.८ अन्वये दोन्ही पक्षात तडजोड झाल्याबाबतचा अहवाल दिला. वादी व प्रतिवादीतर्फे तडजोड पुरसीस नि.क्र.९ वर दाखल करण्यात आली आहे.

२. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोन्ही पक्षांनी तडजोड पुरसीस नि.क्र.९ मधील कथनांबाबत विचारणा केली असता, तसेच प्रतिवादी क्र.६ ते ९ च्या हिश्श्याबाबत विचारणा केली असता, वादी व प्रतिवादीच्या वकीलांनी असे नमूद केले आहे की, सदरच्या तडजोड पुरसीसमध्ये त्याबाबत नमूद करण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे सदरची तडजोड पुरसीस नॉट प्रेस करत आहे. सदरची तडजोड पुरसीस नॉट प्रेस केल्याने वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोड झाली असे म्हणता येणार नाही. जरी मध्यस्तांमार्फत प्रकरण आपसांत तडजोड झाली असा आला असला तरी ती तडजोड नॉट प्रेस केल्यामुळे मान्य करता येणार नाही.

Digitally signed by MANGESH N JAISWAL
Date: 2023.02.27 17:29:25 +0530

इस्लामपूर.

दिनांक २७/०२/२०२३.

**(मंगेश नंदकिशोर जयस्वाल)**

३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

इस्लामपूर.

**- : <u>C E R T I F I C A T E</u> : -**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sagar Anil Kate |
| Court Name | :- | 3rd Jt. Civil Judge, Jr. Dn., Islampur. |
| Date of decision | :- | 27/02/2023. |
| Date of typing | :- | 27/02/2023. |
| Order signed by PO. on | :- | 27/02/2023. |
| Order uploaded on | :- | 27/02/2023. |